## विशेष खटला क्रमांक २३/२०२६ मधील निशाणी १८ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम ४८३ अन्वये धाराशिव शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. ५६७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ६५ (१), ६९, ८८, ८९, २३८, ३ (५), लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ कलम ४, ८, १२, १७ आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम 3 (2) (va), 3 (1) (w) (i), 3 (1) (w) (ii) अन्वये दाखल झालेल्या गुन्हयामध्ये जामीन मिळण्याकरीता दाखल केला आहे. या अर्जाची पार्श्वभूमी थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

२. या प्रकरणातील फिर्याद डॉ. सुनिलदत्त भगवान तंबारे, समाजसेवक अधिक्षक (वैद्यकीय), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव यांनी दाखल केली आहे. फिर्यादीने असा आरोप केला आहे की, दिनांक ११.१२.२०२५ रोजी शासकीय रुग्णालय धाराशिव येथे पिडीतेला उपचाराकरीता दाखल केले होते. पिडीतेसोबत तिची आई (आरोपी क्रमांक ३) आणि हनुमंत रामचंद्र बोडके (आरोपी क्रमांक २) हजर होते. डॉ. शंतनू पाटील यांनी पिडीतेची वैद्यकीय तपासणी करुन पिडीता सहा आठवड्याची गर्भवती आहे असा अहवाल दिला. त्यानंतर पिडीतेची आई आणि हनुमंत बोडके यांनी पिडीतेला पुढील उपचार न करता तिला रुग्णालयातून घेऊन गेले आहेत. पिडीतेसोबत लैंगिक संबंध ठेवणा–या व्यक्तीची विचारपूस करता पिडीतेच्या आईने किंवा हनुमंत बोडके यांनी कोणतेही सहाय्य केलेले नाही. त्याच प्रमाणे नंतर त्या दोघांनी पिडीतेचा बेकायदेशीरपणे गर्भपात सुध्दा केला आहे. या गुन्हयाच्या तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, लक्ष्मण रामचंद्र बोडके (आरोपी क्रमांक १) याने पिडीतेवर लैंगिक अत्याचार केलेला आहे आणि त्यातून पिडीता गर्भवती राहिली आहे.

३. आरोपीचे वकील श्री.वाय.डी.खैरे यांनी असा युक्तीवाद केला की,

फिर्यादीमध्ये आरोपीचे नाव नमूद केलेले नाही. पिडीतेने फिर्याद दाखल केलेली नाही. आरोपी क्रमांक १ यास दिनांक १४.१२.२०२५ रोजी या गुन्हयामध्ये अटक केली आहे. या प्रकरणाचा संपूर्ण तपास पूर्ण झालेला आहे. आरोपी क्रमांक २ व आरोपी क्रमांक ३ यांना जामिनावर सोडले आहे. पिडीतेने हा अर्ज मंजूर करणेस हरकत घेतलेली नाही. त्यामुळे हा अर्ज मंजूर करावा.

४. या उलट सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.एस.सुर्यवंशी यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपी क्रमांक १ हा आरोपी क्रमांक २ चा भाऊ आहे. आरोपी क्रमांक २ यास आरोपी क्रमांक १ याने केलेल्या अत्याचाराची माहिती होती. परंतू त्याने कोणतीही तक्रार केली नाही. पिडीता केवळ १३ वर्षाची होती. अद्याप डीएनए रिपोर्ट आलेला नाही. आरोपी क्रमांक १ आणि पिडीता शेजारी राहतात, त्यामुळे अर्ज मंजूर केल्यास आरोपी तिच्यावर दबाव आणण्याची शक्यता आहे. त्यामुळे जोपर्यंत पिडीतेचा पुरावा नोंदवला जात नाही, तोपर्यंत त्यास जामिनावर सोडू नये.

५. या प्रकरणमध्ये पिडीतेने निशाणी २० येथे आपले म्हणणे दाखल केले आहे. पिडीतेने हा अर्ज मंजूर करणेस हरकत घेतली नाही.

६. दोषारोपपत्रावरुन असे दिसून येते की, आरोपी क्रमांक १ यास या गुन्हयामध्ये दिनांक १४.१२.२०२५ रोजी अटक केलेली आहे. आरोपी क्रमांक १ याने या गुन्हयामध्ये कोणतेही हत्यार वापरलेले नाही. या प्रकरणाचा तपास पूर्ण झालेला आहे आणि सर्व आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. आरोपी क्रमांक २ व ३ यांना न्यायालयाने जामिनावर मुक्त केलेले आहे. परंतू आरोपी क्रमांक १ आणि आरोपी क्रमांक २ व ३ यांचा या गुन्हयातील सहभाग वेगळा आहे. केवळ आरोपी क्रमांक १ यानेच पिडीतेवर लैंगिक अत्याचार केलेले आहेत असा पिडीतेने आरोप केलेला आहे.

७. आरोपी क्रमांक ३ ही पिडीतेची आई आहे. आरोपी क्रमांक ३ आणि आरोपी क्रमांक २ एकत्र राहतात. आरोपी क्रमांक १ हा आरोपी क्रमांक २ चा

सख्खा भाऊ आहे. त्यामुळे आरोपी क्रमांक १ हा पिडीतेवर दबाव आणण्याची शक्यता आहे, हा सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.सुर्यवंशी यांचा युक्तीवाद मान्य होण्याजोगा आहे. परंतू केवळ या कारणावरुन आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर करणे योग्य होणार नाही. आरोपी क्रमांक १ याचा जामीन अर्ज मंजूर करताना त्यास काही कडक अटी लादल्या तर आरोपी क्रमांक १ हा पिडीतेवर दबाव टाकू शकणार नाही. या निष्कर्षावरुन मी खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करतो.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार लक्ष्मण रामचंद्र बोडके यास रक्कम रुपये ५०,०००/- च्या जातमुचलक्यावर व तेवढयाच रकमेच्या जामिनावर सोडण्यात यावे.

३. आरोपीने नियमितपणे न्यायालयामध्ये हजर रहावे.

४. या संपूर्ण प्रकरणाचा निकाल होईपर्यंत आरोपी क्रमांक १ याने न्यायालयात हजर राहण्याच्या कारणा व्यतिरिक्त धाराशिव शहरामध्ये प्रवेश करु नये. तसेच त्याने पिडीतेशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधू नये.

Digitally signed by ANANT SIDDHESHWAR AWATE
Date: 2026.04.02 11:07:30 +0530

दिनांक – ०१.०४.२०२६.

(अ. सि. आवटे)
न्यायाधीश, जलदगती विशेष न्यायालय
धाराशिव.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Mahesh Abhimanyu Pawar,<br>Stenographer Grade - 1 |
| Court | - | Fast Track Special Court,<br>Dharashiv. |
| Date of order/Judgment | - | 01.04.2026 |
| Date of order/judgment signed by presiding officer. | - | 01.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 01.04.2026 |